
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ "मी डोंबिवलीतच, दिल्लीला गेलेलो नाही" - मंत्री रवींद्र चव्हाण

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ राजभवन येथे नागालँड व आसाम राज्य स्थापना दिवस साजरा

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८१ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, सोमवार, ०२ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### घाटकोपर फलक दुर्घटना : भावेश भिंडेची दोषमुक्ततेची मागणी

मुंबई - घाटकोपर येथील फलक दुर्घटनेप्रकरणी जामीन मिळाल्यानंतर इगो मीडियाचा मालक भावेश भिंडे याने आता प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. घटनेनंतर जनतेत निर्माण झालेला संताप कमी करण्याच्या एकमेव उद्देशाने आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आल्याचा दावा भिंडे याने प्रकरणातून दोषमुक्तीची मागणी करताना केला आहे.

भिंडे याने अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते व अटक बेकायदा ठरवून तातडीने जामिनावर सुटका करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही केली होती. उच्च न्यायालयाने मात्र, त्याची अटक कायदेशीर ठरवून त्याची याचिका फेटाळली होती. त्यानंतर, भिंडे याने सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. सत्र न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात त्याला जामीन मंजूर केला होता. भिंडे याने आता आपण निर्दोष असल्याचा आणि आपल्याला विनाकारण या प्रकरणात गोवल्याचा दावा करून प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एम. पाथाडे यांनी भिंडे याच्या अर्जावर पोलिसांना भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देऊन प्रकरणाची सुनावणी ७ डिसेंबर रोजी ठेवली आहे.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त फलाट तिकीट विक्री बंद



मुंबई : महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार फलाट तिकिटांच्या विक्रीवर २ ते ९ डिसेंबरपर्यंत निर्बंध घातले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशविदेशातील लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी येतात. त्यामुळे रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर प्रचंड गर्दी होते. त्यामुळे फलाटांवरील गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने लांब पल्ल्यांच्या स्थानकांवर फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचानिर्णय घेतला आहे.

# भाजपच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा - काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भाजपला गेल्यामुळे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. अशातच, मुंबईतील महत्वाच्या बैठका सोडून शिंदे अचानक गावी गेल्यामुळे या चर्चांना अधिक उधाण आले. मात्र, आता या सर्व चर्चांवर एकनाथ शिंदे यांनी स्पष्टीकरण दिले असून, भाजपच्या निर्णयाला आमचा पूर्ण पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार शिंदेंनी केला.

पान २ वर

## विश्रांतीनंतर एकनाथ शिंदे पुन्हा ठाण्यात




काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रकृती ठीक नसल्याच्या कारणामुळे मागील काही दिवसांपासून त्यांच्या सातारा येथील दरेगावी गेले होते. रविवारी सायंकाळी ते पुन्हा ठाण्यात परतले. त्यांच्या भेटीसाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची गर्दी झाली होती. शिंदे गावी निघून गेल्याने महायुतीच्या सत्तास्थापनेच्या बैठकांच्या फेऱ्या होत नव्हत्या. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवारी सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळगावी निघून गेले होते. त्यामुळे महायुतीतील चर्चेच्या फेऱ्या होऊ शकल्या नव्हत्या. रविवारी सायंकाळी ते हेलिकॉप्टरने पुन्हा ठाण्यात आले.

## दिल्लीची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार - अरविंद केजरीवाल

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी निवडणुकीआधी 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. हरियाणा व महाराष्ट्रात काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर आम आदमी पार्टी सतर्क झाली आहे. त्यांनी रविवारी (१ डिसेंबर) दुपारी पत्रकार परिषद घेऊन त्यांचा निर्णय जाहीर केला. केजरीवाल म्हणाले, "आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी कोणत्याही पक्षाबरोबर आघाडी करणार नाही. आमच्या पक्षाने ही निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे". अरविंद केजरीवाल यांनी आतापर्यंत आघाडीबाबत ठाम भूमिका मांडली नव्हती. मात्र, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीनंतर आपने कोणत्याही पक्षाशी युती अथवा आघाडी न करण्याचा सूर आळवला होता.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीत रोहित पाटील अन् उत्तम जानकरांनाही मोठी संधी



● मुंबई, यश सावंत :

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची आज मुंबईत बैठक संपन्न झाली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा गटनेता म्हणून जितेंद्र आव्हाड यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. तर, दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे सुपुत्र व देशातील सर्वात तरुण आमदार असलेल्या रोहित पाटील यांना मुख्य प्रतोदपदी संधी देण्यात आली आहे. त्यामुळे, कमी वयात मोठी जबाबदारी रोहित पाटील यांच्यावर शरद पवारांनी टाकल्याचं पाहायला मिळत आहे. तसेच, आमदार उत्तम जानकर यांना देखील प्रतोदपदी कार्यभार देण्यात आला आहे. विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांबाबत आज निर्णय झाला नाही, ९ सदस्य उपस्थित होते, आजच्या बैठकीला बीडचे आमदार संदीप क्षीरसागर उपस्थित नव्हते. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने १० जागा जिंकल्या आहेत. त्यात, तासगाव मतदारसंघातून रोहित पाटील तर माळशिरस मतदारसंघातून उत्तम जानकर विधानसभेत पोहोचले आहेत.

पान २ वर

## शिंदे गटाच्या नेत्याची दिवसाढवळ्या हत्या

● पुणे, विशेष प्रतिनिधी :



शिक्रापूर येथे रविवारी (१ डिसेंबर) रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास दत्तात्रय गिलबिले हे दुपारच्या वेळेस आपल्या बंगल्याच्या आवारात खुर्चीमध्ये बसलेले होते. त्यावेळी अज्ञात आरोपींनी अचानक त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला चढवला. हल्लेखोरांनी त्यांच्या मानेवर वार केले. त्यामुळे ते गंभीर जखमी झाली आणि रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांच्यावर वार केल्यानंतर आरोपींनी घटना स्थळवरून पळ काढल्याची माहिती आहे.

पान २ वर

## आवक वाढल्याच्या परिणामस्वरूपात मिरची, आले, फ्लॉवरच्या दरात घट

● पुणे, अभिजित येरल्लू :



मार्केट यार्डातील घाऊक बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक अल्पशी वाढली. हिरवी मिरची, ढोबळी मिरची, आले, फ्लॉवरच्या दरात घट झाली. शेवग्याच्या दरात वाढ झाली असून, अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून ४ ते ५ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ७ ते ८ टेम्पो गाजर, मध्य प्रदेशातून १२ ते १३ ट्रक मटार, तामिळनाडूतून २ टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेशातून ९ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५५० ते ६०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो सात ते आठ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, भुईमुग शेंग ४० ते ५० गोणी, कांदा १०० ते १२५ ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० ते ४५ टेम्पो बटाट्याची आवक झाली.

पान २ वर

## मुंबई सत्र न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

### अनिल परब, श्रद्धा जाधवसह ४८ शिवसैनिकांना दिलासा

● मुंबई, राकेश गायकवाड :





भाजप नेते नारायण राणे यांची सभा उधळवल्या प्रकरणामध्ये ४८ शिवसैनिकांना दिलासा मिळाला आहे. २००५ मध्ये शिवसेना सोडलेल्या नारायण राणे यांची सभा उधळल्या प्रकरणी या सर्वांची निर्दोष मुक्तता झाली आहे. यामध्ये शिवसेना नेते अनिल परब, मुंबईच्या माजी महापौर श्रद्धा जाधव, बाळा नांदगावकर, बाळा नर यांच्यासह ४८ शिवसैनिकांचा समावेश आहे. या सर्वांची सबळ पुराव्यांअभावी शनिवारी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२००५ साली शिवसेनेला सोडचिठ्ठी दिल्यानंतर प्रभादेवीच्या नागू सयाजी वाडीत नारायण राणेंच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेनेचे मुखपत्र दैनिक 'सामना' च्या कार्यालयासमोरच ही सभा होणार होती. पण सभेदरम्यान शिवसैनिकांनी नारायण राणेंच्या निषेधार्थ घोषणाबाजी करून सभा उधळवून लावल्याचा आरोप करण्यात आला होता.

याप्रकरणी शिवसैनिकांविरोधामध्ये दादर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिवसैनिकांनी वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलन केले होते. याप्रकरणी शिवसैनिकांविरोधात ५ गुन्हे दाखल करण्यात आले होते. या घटनेच्या १९ वर्षांनंतर याप्रकरणावर शनिवारी निकाल आला. न्यायालयाने गुन्हा दाखल झालेल्या ४८ शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता केली. मुंबई सत्र न्यायालयाने सबळ पुराव्यांअभावी सर्वांची निर्दोष मुक्तता केली.

पान २ वर

## मनसेचे नेते अविनाश जाधव यांचा ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा

● ठाणे, रोहित जैसवाल :



ठाणे आणि पालघर जिल्ह्यात मनसेच्या उमेदवारांचा पराभव झाल्याने अविनाश जाधव यांनी रविवारी ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा दिला आहे. अविनाश जाधव हे ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून मनसेचे उमेदवार होते. परंतु त्यांचा देखील पराभव झाला होता. ठाणे आणि पालघर जिल्ह्यात अविनाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारांनी निवडणूका लढविल्या होत्या. अविनाश जाधव यांनी सुद्धा ठाणे शहर मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. परंतु त्यांचा या मतदारसंघातून भाजपचे उमेदवार संजय केळकर यांनी पराभव केला होता. या मतदारसंघात अविनाश जाधव हे तिसऱ्या क्रमांकावर होते. ठाणे जिल्ह्यातील मनसेच्या इतर उमेदवारांचाही पराभव झाला होता. अखेर अविनाश जाधव यांनी ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष पदावरून राजिनामा दिला आहे. राजिनाम्याचे पत्र त्यांनी पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विधानसभा निवडणुकीत ठाणे आणि पालघर येथील पराभवाची जबाबदारी घेऊन मी जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा दिला आहे. काम करताना माझ्याकडून कळत-नकळत काही चूक झाली असल्यास आपण माफ करावे असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी आरपीएसआय चतु:सूत्री महत्त्वाची

## कोची येथील गोलमेज परिषदेत डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

● कोची, सचिन कदम :



सार्वजनिक मोहीमेच्या अंमलबजावणी, नियोजन आणि मूल्यमापनात महिलांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय मोहीम यशस्वी होऊ शकत नाही असा माझा ठाम विश्वास आहे. महिला सक्षमीकरणासाठी 'आरपीएसआय' चतु:सूत्री महत्त्वाची आहे असे प्रतिपादन विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. कोची येथे राजकीय महिलांचे नेटवर्क गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आली होते. दि. २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या दोन दिवसीय परिषदेत महिलांच्या सक्षमीकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विधान परिषदेच्या उपसभापती आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "महिला सक्षमीकरणासाठी खासदार आणि आमदार महिलांचे राजकीय नेटवर्क तयार करण्याची भूमिका आणि पद्धती" या विषयावर मार्गदर्शन करुन गोलमेज परिषदेचा समारोप केला. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, १) लैंगिक समानतेच्या दृष्टीकोनातून प्रतिसाद देणारे आणि जबाबदार नेतृत्व २) स्थानिक ते राष्ट्रीय स्तरापर्यंत जाळे विकसित करण्यासाठी, दर्जेदार वेळ आणि कामावर आधारित निर्णय घेण्यासाठी मापदंड. ३) भारतीय राजकारणातील विविध क्षेत्रांसाठी बहुलता (Plurality) आणि विविधतेसाठी जागा ४) कायदेशीर बाबी, धोरणात्मक निर्णय, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या घडामोडी यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक ही महिला सक्षमीकरणासाठी 'आरपीएसआय' चतु:सूत्री महत्त्वाची आहे. असे सांगून डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, चार दशकांहून अधिक काळ एक सामाजिक कार्यकर्ता या नात्याने मी माझ्या सर्व कार्यात नेहमीच महिलांना केंद्रस्थानी ठेवले आहे. "सरकारने सुरू केलेल्या विविध कृती, कल्याणकारी योजना, उपक्रम यांचे महत्त्व लक्षात घेता तळागाळात त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज संस्थांमध्ये तसेच भारतीय संसदेत महिलांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# विश्वसनीय आणि दीर्घकालीन फायद्याचे

विधानसभा निवडणुकांत शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना या पक्षांचे मोठे नुकसान संख्यात्मकदृष्ट्या झाले. काँग्रेसचे तसे नाही. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर त्या पक्षाची कामगिरी निराशाजनक झाली. संख्येत तर त्या पक्षाने मार खाल्लाच. पण त्याच वेळी पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर आदी ज्येष्ठ, अनुभवी आणि अभ्यासू काँग्रेस नेत्यांस या निवडणुकीत पराभव चाखावा लागला. हे धक्कादायक होते. त्या पक्षासाठी आणि अन्यांसाठीही. अवघ्या चार महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्या 'महाविकास आघाडीने घवघवीत यश नोंदवले. त्या वेळी भाजप, अजितदादांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्या सत्ताधारी महायुतीपेक्षा विरोधकांच्या महाविकास आघाडीचा विजय दर लक्षणीय होता. महाराष्ट्रातून निवडून दिले जाणारे ४८ पैकी ३१ खासदार महाविकास आघाडीच्या गोटातील होते. त्या निवडणुकीत जवळपास १५५ विधानसभा मतदारसंघांत 'मविआ'स आघाडी होती. आताच्या विधानसभा निवडणुकांत मात्र ती कापराप्रमाणे उडून गेली. कॉंग्रेसला दारुण पराभवाबरोबरीने आपल्या नायकांस पराभूत होताना पाहावे लागले. आता त्या पक्षाचे धुरीण इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन आदी कारणांकडे बोट दाखवताना दिसतात. ही सर्व बाह्य कारणे. यातील मतदान यंत्रांचा मुद्दा सोडल्यास अन्य कारणांत काही तथ्य असू शकेलही. पण इतका मोठा पराभव हा केवळ बाह्य कारणांनी होऊ शकत नाही. त्यामागे 'आतील कारणेही तितकीच निर्णायक असतात. त्यांचा विचार करण्याचा प्रामाणिकपणा काँग्रेस दाखवणार का? तो दाखवल्यास आपण लोकसभेतील कामगिरीवर अवास्तव विसंबून राहिलो हे काँग्रेसजनांस मान्य करावे लागेल. लोकसभेत त्या पक्षाचे (एक अपक्ष धरून) १०० खासदार निवडून आले. बऱ्याच काळाने काँग्रेसची खासदार संख्या तीन आकडी झाली. ते जनमत खरे तर भाजपच्या 'चारसो पारच्या नाऱ्याविरोधात होते. त्यातून भाजपच्या रथाचा वेग तेवढा कमी झाला. पण ते जनमत भाजपने रथातून पायउतार व्हावे असे नव्हते. काँग्रेसने तसा अर्थ घेतला आणि आपण जणू विजयच मिळवला असे त्या पक्षास वाटू लागले. ते हवा डोक्यात जाणे होते. वास्तविक त्यानंतरच्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत दणका बसल्यावर काँग्रेसला भान येण्यास हरकत नव्हती. तसे झाले नाही. लोकसभा निवडणुकांत भाजपच्या 'चारसो पार च्या घोषणेने आणि त्या पक्षाच्या काही बेजबाबदार नेत्यांच्या वक्तव्यांमुळे 'संविधान बदला'चा मुद्दा विरोधकांच्या हाती आयताच पडला. त्याचे त्यांनी सोने केले आणि भाजपस लोकसभा निवडणुकीत साधे बहुमतही मिळवता आले नाही. पण हे जणू आपल्या 'संविधान बचाव' मोहिमेचे यश असा ग्रह काँग्रेसने त्यानंतर करून घेतला.

त्या निवडणुकीत ते ठीक होते. पण एकदा विकली गेलेली चीन पुन्हा विकण्यास काढली की तिचे मूल्य घसरते या विक्रय कलेतील साध्या तत्त्वाचा विसर काँग्रेसजनांस पडला आणि हरियाणा, महाराष्ट्रात या पक्षाचे राहुल गांधी संविधान बदलाचे तेच तुणतुणे पुनःपुन्हा वाजवत राहिले. लोकसभेच्या वेळी या मुद्द्यास मिळाला त्याच्या दहा टक्केही प्रतिसाद या विधानसभा निवडणुकांत या मुद्द्यास नव्हता. पण आपल्याच तंद्रीत मस्त राहुल गांधी यांनी या वास्तवाकडे लक्षच दिले नाही. कदाचित लाळघोटेपणासाठी विख्यात काँग्रेसजनांनी त्यांच्या कानी हे सत्य घालण्याचे धाडस केले नाही, असेही असेल. काहीही असो. पण विधानसभा निवडणुकांत जनतेच्या कल्पनाशक्तीस काँग्रेस आकृष्ट करू शकली नाही. दुसरे असे की इतक्या महत्त्वाच्या राज्यात राहुल गांधी यांनी जेमतेम चार सभा घेतल्या. आणि प्रियंका गांधी यांनी एक. खरे तर महाराष्ट्राचे महत्त्व लक्षात घेता त्यांनी राज्य पिंजून काढत स्वपक्षीयांना आत्मविश्वास देणे गरजेचे होते. तसे झाले नाही. परिणामी राज्य काँग्रेस ही अनाथ भासली. काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व मतदारांस प्रचारातून आकृष्ट करू शकले नाही. पण त्याआधी काँग्रेस आणि शिवसेना नेते यांच्यात रंगलेले कलगीतुरे 'महाविकास आघाडीतील मतभेदांकडे मतदारांचे लक्ष वेधून घेत होते. यात सर्वात लक्षवेधी होते ते कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, त्यांनी आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संजय राऊत यांनी केलेले मनोरंजन लाजवाब होते.

## आजची चित्रोळी



लेकराला घांस देण्या
खूप कष्टावे लागते !
लेकरां साठींच सारे
माय जगीं सोसते !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# शस्त्रास्त्रे झाली उदंड

विनाशकारी शस्त्रांची अधिकाधिक उपलब्धता होत असल्याने मानवी हिंसक प्रवृत्ती भयंकर रूप धारण करत आहेत. शस्त्रांवरचे वाढते खर्च पाहता अनेक देशांची पायाभूत सुविधा पूर्ण करण्याची क्षमताही संकुचित होते.

लहानमोठे विविध प्रकारच्या संहारक शस्त्रांचा वाढता प्रसार हा जगाती शस्त्रनिर्मिती उद्योगात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. हा एक मोठा धनलाभ मिळवून देणारा उद्योग असून त्यात भ्रष्टाचार किंवा अन्य मार्गातून राजकारणावर प्रभाव पाडण्याची प्रचंड क्षमता आहे. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेने विविध उद्योगांची रँकिंग आखताना लाचखोरीचा निकष ठेवला आणि लाचखोरीचे सर्वाधिक प्रमाण कोणत्या उद्योगात आहे, यावर जागतिक उद्योगाची क्रमवारी ठरविण्यात आली. यात शस्त्रास्त्रे उद्योगाला दुसरे स्थान मिळाले. अमेरिकी वाणिज्य विभागाच्या जनरल अकाउंटिंग ऑफिसच्या माहितीनुसार, सर्व प्रकारच्या एकूण व्यापारापैकी ५० टक्के लाच देण्याचे प्रमाण शस्त्रांशी संबंधित व्यापारात दिसून येते. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार या क्षेत्रात जेवढ्या किमतीचा व्यवहार होतो, त्याच्या किमान दहा टक्के लाच दिली जाते. हे दहा टक्के अब्जावधी डॉलरमध्ये असतात.

शस्त्रांच्या विक्रीशी संबंधित भ्रष्टाचाराची मोठी रक्कम ही छुप्या मार्गाने परकी खात्यात जमा केली जाते; परंतु त्याचा भांडाफोड होण्याच्या भीतीने आता त्यात बदल होत आहेत आणि नवनवीन युक्त्या शोधल्या जात आहेत. एकप्रकारे भ्रष्टाचाराला वाचा झुटणार नाही, याची खबरदारी घेतली जात आहे. रणगाडे, मोठ्या तोफा, लढाऊ विमाने, जहाज, पाणबुड्या आदींच्या व्यवहारात खूपच सधन आणि धनाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्या सामील आहेत आणि त्यांचे थेट हात वर पर्यंत पोचलेले असतात. या कंपन्या सत्ताधार्यांवर प्रभाव टाकतात आणि अब्जावधी डॉलरचे करार करण्यास भाग पाडतात.

मग या कारणामुळे जगातील वर्तमान आणि भविष्यकाळ संकटात का पडेना, त्यांचे याच्याशी काही देणेघेणे नसते. या कंपन्या आणि त्याच्या दलालांमुळे निःशस्त्रीकरणाचे प्रयत्न पुढे सरकू शकले नाहीत. सध्या या गोष्टींची जगाला नितांत गरज आहे. जगातील बहुतांश जनता शांतता आणि सौहार्दतेने राहण्याची इच्छा बाळगून आहे; परंतु शस्त्र करारातील आर्थिक हेतु स्पर्धा तसेच मिलीभगत ठेवणारे नेते हे असे वातावरण तयार करतात की तेथे महागडे शस्त्रे असणे गरजेचे वाटू लागते.

परिणामी संहारक शस्त्रांना नियंत्रित करणारा आंतरराष्ट्रीय करार पुढे जाण्याऐवजी तो मागे पड़त असून त्याचा प्रभाव हा दिवसेंदिवस कमी होत आहे. दुसरीकडे प्रत्येक प्रकारच्या लहानमोठ्या आणि हलक्या शस्त्रांतील संहारक क्षमता वाढविली जात असून त्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेतला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने 'हिंसा आणि आरोग्य' यावरचा अहवाल पाहता गोळ्यांची मारक क्षमता, वेग आणि पल्ला यात प्रचंड प्रमाणात वाढ केली आहे. त्याचबरोबर या शस्त्रांची संहारकतादेखील वाढली आहे.

एके-४७ मध्ये तीन सेकंदात किमान तीस फैरी झाडण्याची क्षमता आहे आणि प्रत्येक गोळी ही एक किलोमीटरपेक्षा अधिक लांब पल्ल्यांपर्यंत लक्ष्य वेधू शकते. 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल आणि 'ऑक्सफेम'च्या अहवालात म्हटले, कोणत्याही शस्त्रांच्या तुलनेत लहान शस्त्रांचा वापर हा अधिकाधिक लोकांचा जीव घेणे, जखमी करणे स्थलांतरित करण्यास भाग पाडणे, शोषण करणे, अपहरण करणे, अत्याचार करणे यासाठी केला जातो. सध्या जगात सुमारे ६४ कोटी शस्त्रे आहेत. विशेष म्हणजे जगातील सुमारे ६० टक्के लहान शस्त्रे ही सैन्य आणि पोलीस दलाच्या कार्यक्षेत्राबाहेर आहेत. केवळ लष्कराच्या वापरासाठी एका वर्षात चौदा अब्ज गोळ्यांचे उत्पादन केले जाते. म्हणजे जगातील एकूण लोकसंख्येच्या दुप्पट. एकीकडे मानवी वृत्ती हिंसक होत असताना त्याचवेळी हानिकारक शस्त्रांची मुबलक उपलब्धता चिंताजनक आहे. धोकादायक शस्त्रांना मागणी वाढत आहे, त्याच्या अधिकाधिक वापरामुळे संभाव्य विनाशाची भीतीही वाढत आहे. सध्या जगात शस्त्रस्पर्धा वाढत असून अब्जावधी डॉलरमध्ये शस्त्रांचे करार होतात, तर त्याचवेळी संबंधित देशातील लोकसंख्येचा मोठा भाग स्वच्छ पाण्यापासून वंचित राहतो किंवा कुपोषणाने पीडित आहे. जगभरातील विविध पातळीवर निःशस्त्रीकरणाचे अभियान वेगाने राबविण्याची गरज आहे. या मोहिमेच्या बळावर शस्त्र, स्फोटक साहित्यांची मागणी, उत्पादन उपलब्धता आणि वास्तविक वापर याच्या प्रत्येक स्तरावर काम करता येईल. जागतिक पातळीवर धोकादायक शस्त्रांविरोधात अनेक मोहिमा राबविल्या आणि आजही सक्रिय आहेत. अशा प्रयत्नांतून जागतिक पातळीवर काही धोकादायक शस्त्रांवर बंदी घालणारे काही करारही झाले. भूसुरूंग स्फोटक तर खूपच धोकादायक आहे. या कारणांमुळे निष्पाप लोकांचा नाहक बळी जातो. एकतर ते गंभीर जखमी होतात आणि अनेकदा तर आयुष्यभर अपंगत्वाचा सामना करावा लागतो. युद्ध संपल्यानंतरही बराच काळापर्यंत युद्धाच्या काळात पेरून ठेवलेले आयईडीसारख्या स्फोटकांच्या भागात लहान मुले आणि नागरिकांचा वावर राहतो. ते एकप्रकारे ज्वालामुखीवर राहात असतात. भूसुरुंगांवर बंदी घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय करार झाले. बहुतांश देशांनी त्यास मान्यता दिली; परंतु काही महत्त्वाच्या देशांची मान्यता मिळणे अजून बाकी आहे. अनेक दहशतवादी संघटना भूसुरुंगाचा वापर करत दहशत निर्माण करत असतात. आता तर क्लस्टर बॉम्बसारखे अति धोकादायक स्फोटक उपलब्ध झाले आहे. त्यात एक मोठ्या बॉम्बने लहानसहान बॉम्ब फेकले जातात आणि त्याचे स्फोट होतात. तडाख्यात त्यातील काही बॉम्ब तत्काळ टतात तर काही काही तासांनंतर गुटतात. ते नागरिकांना गंभीर जखमी करतात किंवा जीवावरही बेततात. प्रामुख्याने अशा स्फोटकांच्या सापडलेल्या लहान मुलांना बराच काळ वेदनादायी त्रास सहन करावा लागतो. क्लस्टर बॉम्बविरुद्ध देखील मोठी मोहीम राबविण्यात आली. परिणामी त्यावर बंदी घालणारा आंतरराष्ट्रीय करार देखील झाला. हे एक मोठे यश आहे आणि त्यावर अजून काही देशांच्या स्वाक्षर्या राहिल्या आहेत. 'ब्लाइंडिंग लेसर' हे अंधत्व आणणार्या लेसरवर बंदी आणणारा एक आंतरराष्ट्रीय करार देखील झाला आहे.

आता एक मोठे आव्हान म्हणजे रोबोटिक्सचा लष्करात होणारा वापर, रोबोचा लष्करात वापर केल्यास अनेक धोके आहेत. विशेष म्हणजे अशा प्रकारचे शस्त्र हे मानवी नियंत्रणाच्या बाहेरचे असू शकते आणि ते अधिक विध्वंसक असू शकते. रोबो आल्याने युद्धाची तीव्रता ही गंभीर पातळीवर पोचू शकते आणि त्यालाही स्वयंचलित मशीनने नियंत्रित केले जाऊ शकते. एका अर्थाने युद्धाशी संबंधित विनाश आणि अनिश्चितता ही कमालीची वाढत आहे. स्टिफन हॉकिन्ससारख्या शास्त्रज्ञांनी रोबोटिक्सचा लष्करातील वापराविरुद्ध मत मांडून त्यावर बंदी घालण्याची मागणी केली होती. या मुद्द्यावर आंतरराष्ट्रीय पातळीवर जीवघेण्या रोबोला रोखण्यासाठी अभियान सक्रिय आहे. या प्रकारच्या अभियानात जनता सहभागी होत असेल तर धोकादायक शस्त्र वापरण्याची शक्यता कमी असू शकते आणि त्याला रोखता येऊ शकते. नव्याने निर्माण होणार्या तणावामुळे जगात अनेक स्तरावर युद्धजन्य स्थिती निर्माण होत आहे. आता सर्वात मोठे आणि कठीण आव्हान तर अण्वस्त्रांचा प्रसार आणि संभाव्य वापर करण्यापासून रोखण्याचे आहे.

# अवैध गॅस अड्ड्यावर छापा ११ लाखाचा मुद्देमाल जप्त

नाशिक (**नितीन देवळेकर**) : देवळा तालुक्यात घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरुन देणाऱ्या अड्ड्यावर नाशिक ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून १३६ सिलेंडर, दोन चारचाकी वाहने आणि गॅस भरण्याची साधनसामग्री असा ११ लाख १५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. देवळा पोलीस ठाणे हद्दीत सुभाषनगर परिसरात काही संशयित हे घरगुती गॅस व्यावसायिक कारणांसाठी असलेल्या निळ्या रंगाच्या सिलेंडरमध्ये अवैधरित्या भरुन देत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली. पथकाने छापा टाकला. भागवत जाधव (४२, रा. सुभाषनगर) या संशयिताविरुध्द गुन्हा दाखल केला. छाप्यात घरगुती वापराचे १०१ सिलेंडर, निळ्या रंगाचे ३५ सिलेंडर असे एकूण १३६ गॅस सिलेंडर, इलेक्ट्रिक वजनकाटा, गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारे दोन पंप, इलेक्ट्रॉनिक मोटार तसेच दोन चारचाकी वाहने असा मुद्देमाल जप्त केला.

पान १ वरून...

### भाजपच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा...

एकनाथ शिंदेंनी आज मीडियाशी संवाद साधताना सांगितले की, 'मुख्यमंत्री म्हणून माझ्या नेतृत्वाखाली निवडणुका झाल्या होत्या. आम्हाला जनतेने यश प्रचंड मिळवून दिले. मी मागच्या आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन माझी भूमिका स्पष्ट केली होती. नरेंद्र मोदी आणि अमित शाहा मुख्यमंत्रीपदाबाबत जो निर्णय घेतील, त्याला माझा आणि शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा असेल. आमच्या मनात किंतु-परंतु नाही आणि इतर कुणाच्याही मनात नसावा,' अशी स्पष्टोक्ती शिंदेंनी दिली.

तुम्ही महत्वाची खात्यांची मागणी केली आहे, हे खरंय का? श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्री करण्याची चर्चा सुरू आहे, हे खरंय का? या प्रश्नांना उत्तर देताना शिंदे म्हणाले, 'चर्चा सुरू आहेत आणि या चर्चेतून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतील. आम्हाला लोकांनी निवडून दिले आहे, लोकांना जी आश्वासने आम्ही दिली आहेत, ती आम्हाला पूर्ण करायची आहेत. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने लोकांशी आम्ही बांधील आहोत आणि ती बांधीलकी जपायची आहे. मला काय मिळाले, कोणाला काय मिळाले, यापेक्षा जनतेला काय मिळणार आहे, हे महत्वाचे आहे. जनतेले आम्हाला भरभरुन दिले आहे, आमच्यावर मतांचा वर्षाव केला आहे, आता आम्ही त्यांना देण्याचा प्रयत्न करणार आहोत.'

#### आम्ही तिघे निर्णय घेऊ

'आम्ही एक बैठक अमित शाहांसोबत झाली होती, आता आमची तिघांची बैठक होईल आणि यातून महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय घेतला जाईल. राज्याने आम्हाला खूप दिले आहे, राज्यात लवकर चांगले सरकार स्थापन व्हावे, अशी जनतेची इच्छा आहे. लोक काय बोलतात, विरोधक काय बोलतात, ह्याच्याशी आम्हाला घेणं-देणं नाही. महायुतीत कुठलाही समन्वयाचा अभाव नाही. मला माझी भूमिका परत परत मांडण्याची गरज नाही. मी यापूर्वीच सांगितले की, भाजप जो निर्णय घेईल, त्याला आमचा पूर्ण पाठिंबा असेल,' असेही शिंदेंनी यावेळी सांगितले.

### मुंबई सत्र न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

अनिल परब, श्रद्धा जाधव, बाळा नर, बाळा नांदगावकर, सदा सरवणकर, रवींद्र चव्हाण, जितेंद्र जानवळे, राजेंद्र सूर्यवंशी, ज्योती भोसले, सुप्रिया नार्वेकर, स्वाती शिंदे, स्नेहल जाधव, मुकुंद पडयाळ, अजित कदम, संजय कदम, लता रहाटे, राजीव कोरी, विजय लोके, आत्माराम शिंदे, सदानंद परब, लक्ष्मण भोसले, राजू पेडणेकर, सुमित्रा पत्रे, नारायण काशीराम राणे, सुधा मेहेर, श्रीधर सावंत, हरिश्चंद्र कदम, सुनंदा सरकारे, श्रीधर शेलार, गोपीचंद भिलारे, सुगंधा शेटये, संजय भावके, रागिणी मांजरेकर, भावेश मथुरिया, सुभाष जाधव, वत्सला जाधव, हरिश्चंद्र सोलकर, अनिल राणे, वनिता इन्सुलकर, यशवंत जाधव, चंद्रपालचत्रु चंडेलिया, विक्की दुर्गावाले, जयश्री मतवंडकर, अनुसया महपती, रजनी मिस्त्री, सरिता इंगळे, धनंजय कांबळे, दीपक मोरे या सर्व शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

### महिला सक्षमीकरणासाठी...

लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण लक्षात घेता, हा संसदेतील महिलांच्या आरक्षणाचा महत्वपूर्ण निर्णय एक स्वागतार्ह पाऊल आहे.

महिला खासदार, आमदार, याबाबत धोरण बनवण्याच्या टप्प्यावर, त्याच्या योग्य अवलंब करण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि शाश्वत विकासासाठी पुरेसा निधीची विशेष तरतूद करण्यात यावी. विधिमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंच देखील या दिशेने अधिक योगदान देऊ शकतो. तसेच जागतिक महिला आयोगाचे ६९ सत्र आणि बीजिंग + 30 थीमसाठी निवडून आलेल्या सदस्यांमध्ये आणि त्यांच्या मतदारसंघांमध्ये अधिक जागरूकता होणे आवश्यक आहे. जागतिक ते स्थानिक पातळीवर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात महिला आघाडीवर आहेत. महिला गटांचे डिजिटलायझेशन आणि क्षमता निर्माण कार्यक्रमाची गरज आहे. संसद आणि विधान मंडळांनी सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणविषयक समस्यांवर प्रत्येक सत्रात आपापल्या सभागृहात अर्थपूर्ण आणि परिणामाभिमुख चर्चा केली पाहिजे.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या महिला सबलीकरणाचा राष्ट्रीय आढावा आरोग्य, शिक्षण, महिला आणि मुलींची सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित करून महिला आमदारांची राष्ट्रीय गोलमेज परिषद आयोजित केली जावी. महिलांचा आर्थिक विकास आणि शाश्वत विकासाचे उद्दिष्टे एकत्रित करण्याची गरज आहे.

"मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी महिलांना प्रोत्साहित केले गेले आणि त्यामुळे अनेक मतदारसंघात विजय मिळवला गेला. या सर्व महिला मतदार निश्चितपणे शाश्वत विकासाच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या पुरस्कर्त्या बनल्या आहेत . असे ही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत महिला लोकप्रतिनिधींच्या नेटवर्क संदर्भात निर्णय घेण्यात आला.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या...

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालात महाविकास आघाडीला अपेक्षित यश आलं नसून केवळ ४९ जागांवर त्यांना विजय मिळाला आहे. त्यामध्ये, २० जागा जिंकून शिवसेना ठाकरे गट हा सर्वात मोठा पक्ष ठरला, तर काँग्रेसने १७ जागा जिंकल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाला केवळ १० जागांवर यश मिळालं. त्यामुळे, महायुतीमधील एकाही पक्षाकडे विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढे संख्याबळ नाही. मात्र, महाविकास आघाडीमधील पक्षांकडून विधिमंडळ गटनेते आणि प्रतोपदी पक्षातील नवनिर्वाचित आमदारांची नियुक्ती केली जात आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाने मुंबईत बैठक घेऊन गटनेता व प्रतोद यांची निवड केली होती. आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही गटनेता, मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांची नियुक्ती जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. त्यानुसार, कळवा-मुंब्रा विधानसभेतून आमदार बनलेले राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते जितेंद्र आव्हाड हे राष्ट्रवादीचे गटनेते बनले आहेत. तर, मुख्य प्रतोदपदी दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे चिरंजीव आमदार रोहित पाटील यांना संधी देण्यात आली आहे. तसेच, माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांना प्रतोदपदी नियुक्ती देण्यात आली आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांची पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठक पार पडली होती. या बैठकीत भास्कर जाधव यांची विधानसभेतील पक्षाचे गटनेते म्हणून निवड करण्यात आली. तर, सुनील प्रभू यांना पुन्हा एकदा पक्षाचे प्रतोद बनविण्यात आले आहे. तर, आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

### शिंदेंच्या नेत्याची दिवसाढवळ्या हत्या

घटना समजल्यानंतर गिलबिले यांना तात्काळ पुणे येथे खाजगी रुणालयात नेण्यात आलं. मात्र, रुणालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला आहे. दिवसा ढवळ्या खुनाची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. मालमत्तेच्या वादातून हा प्रकार घडला असल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. हल्लेखोर यांची नावे आणि संख्या निष्पन्न झाली आहे. या घटनेचा अधिक तपास शिक्रापूर पोलीस करत आहे. लवकरात लवकर आरोपींना अटक करण्यात येईल असं पोलिसांनी सांगितलं आहे.

### आवक वाढल्याने मिरची, आले,...

मेथी, कांदापात, मुळे, चुक्याच्या दरात घट

गेल्या आठवड्याच्या तुलनेत मेथी, कांदापात, करडई, मुळे, चुका या पालेभाज्यांच्या दरात घट झाली आहे. कोथिंबिर, चाकवत, करडई, पुदिना, राजगिरा,अंबाडी, चवळई, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबीर दीड लाख जुडी, तसेच मेथीच्या ८० हजार जुडींची आवक झाली. बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे – कोथिंबीर- १५०० ते २०००, मेथी – १००० ते २०००, शेपू – ५०० ते १२००, कांदापात- १२०० ते १५००, चाकवत – ५०० ते ८००, करडई- ४०० ते ८००, पुदिना – ८०० ते १०००, अंबाडी – ५०० ते ८००, मुळे – १००० ते १५००, राजगिरा- ५०० ते ८००, चुका – ५०० ते ८००, चवळई- ५००-८००, पालक- १०००-१५००. हरभरा गड्डी – १००० ते १५००

लिंबांचा दरात घट

मार्केट यार्डातील फळबाजारात लिंबांच्या दरात घट झाली. बोरांच्या दरात वाढ झाली आहे. कलिंगड, खरबूज, सीताफळ, अननस, मोसंबी, संत्री, डाळिंब, पेरु,चिकूचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी २५ ते ३० टन, संत्री ६० ते ७० टन, डाळिंब ४० ते ५० टन, पपई २० ते २५ टेम्पो, लिंबे दीड ते दोन हजार गोणी, कलिंगड ८ ते १० टेम्पो, खरबूज ३ ते ४ टेम्पो, चिकू एक हजार गोणी, पेरू ८०० ते ९०० प्लास्टिक जाळी (क्रेट), बोरे दोन हजार गोणी, सीताफळ १० ते १२ टन अशी आवक झाली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# "मी डोंबिवलीतच, दिल्लीला गेलेलो नाही" - मंत्री रवींद्र चव्हाण

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** मागील पाच दिवसांपासून महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी भाजपच्या इतर नेत्यांबरोबर डोंबिवली विधानसभा मतदारसंघातील भाजपचे नवनिर्वाचित आमदार आणि ज्येष्ठ नेते रवींद्र चव्हाण यांचेही नाव चर्चेला येत आहे. शनिवारी ते तातडीने दिल्ली येथे गेल्याची चर्चा समाजमाध्यमांवर पसरली होती. काही माध्यमांनी याविषयी बातम्या चालविल्या. या सगळ्या अफवांवर स्पष्टीकरण देताना भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी मात्र, मी डोंबिवलीतच आहे, मी दिल्लीला गेलेलो नाही, असे स्पष्टीकरण ट्विटर (एक्स) च्या माध्यमातून रविवारी दिले आहे.

गेल्या तीन दिवसांपासून मी माझ्या डोंबिवली विधानसभा मतदारसंघात आहे. सद्यस्थितीत डोंबिवलीतील नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहे. मी दोन दिवसात किंवा मध्यरात्री कुठल्याही वरिष्ठ नेत्याच्या भेटीसाठी दिल्ली अथवा अन्य ठिकाणी गेलेलो नाही, असे स्पष्टीकरण देऊन नेते चव्हाण यांनी सुरू असलेल्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.



आठवडा होत आला तरी राज्याचा मुख्यमंत्री ठरत नसल्याने राज्याच्या मुख्यमंत्री पदावरून विविध प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चेच्या माध्यमांतून अफवा पसरत आहेत. राज्याचा मुख्यमंत्री ठरविण्याच्या जोरदार हालचाली दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात सुरू आहेत. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाबरोबर, या चर्चेबरोबर मराठा चेहरा महाराष्ट्राला देण्याची गरज असल्याच्या चर्चा भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात आहेत.

मध्यप्रदेश, हरियाणाचा अनुभव भाजप नेत्यांच्या गाठीशी आहेत. या राज्यांच्या मुख्यमंत्री पदासाठी कोणाच्याही स्वप्नात, मनात नसलेले चेहरे भाजपच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री पदावर बसवून त्या त्या राज्यातील भाजपच्या इच्छुक, मुख्यमंत्री पदावर बसण्यासाठी सज्ज असलेल्या नेत्यांना हादरे दिले होते. आता तीच परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण केली जात आहे की काय, अशी धाकधूक भाजपच्या नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये आहे.

राज्य भाजपमधील एक मोठा गट मात्र देवेंद्र फडणवीस यांनाच मुख्यमंत्री करावे, यासाठी देव पाण्यात बुडवून बसला आहे. तर, मराठा आरक्षण, आंदोलने विचारात घेता मराठा चेहरा महाराष्ट्राला असावा या चर्चा आणि अफवांच्या माध्यमातून भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे, मंत्री रवींद्र चव्हाण, मुरलीधर मोहोळ, चंद्रशेखर बावनकुळे, गिरिश महाजन यांची नावे विविध माध्यमांतून चर्चेला येत आहेत. मोहोळ यांनी समाज माध्यमातून आपण या स्पर्धेत नसल्याचे स्पष्ट केले आहे. शनिवारपासून रवींद्र चव्हाण यांचे नाव चर्चेत आल्याने, अखेर चव्हाण यांना आपण दिल्लीत गेलेलो नाही आणि डोंबिवलीत असल्याचे स्पष्टीकरण द्यावे लागले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर घडलेल्या सर्व गुप्त हालचालींचे सूत्रधार म्हणून रवींद्र चव्हाण यांनी पार पाडलेली जबाबदारी. कोकणासह, ठाणे, कोकणपट्टीवरील त्यांची हुकमत आणि विधानसभा निवडणुकीत त्यांनी जेथे जेथे जोरकसपणे प्रचार केला. तेथील सर्व महायुतीचे उमेदवार निवडून आले. ते चौथ्यादा निवडून आले आहेत. ठाणे जिल्ह्याचे राज्य कारभारतील महत्वाचे स्थान विचार घेता, जिल्ह्यावर आता भाजपची हुकमत वाढविण्यासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव चर्चेत येत असावे, असे सांगत भाजपच्या एका नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर मात्र, या सगळ्या अफवाच आहेत. दोन दिवसात खरे काय ते चित्र पुढे येईल, असे सांगितले.

## ठाणे शहरात काँग्रेसला खिंडार! कळवा येथील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**ठाणे (रोहित जैसवाल) :** शहरातील काँग्रेसचे मनोज शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला असतानाच, त्यापाठोपाठ आता, कळव्यातील काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे ठाणे शहरात काँग्रेस पक्षाला खिंडार पडल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. कळवा पूर्व घोलई नगर येथील काँग्रेसचे सामाजिक न्याय ठाणे शहर अध्यक्ष जगदीश गौरी हे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह रविवारी वर्तक नगर येथील भाजप कार्यालयात दाखल झाले. भाजपचे कामगार मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रशांत तळवडेकर यांच्या पुढाकाराने आणि भाजप ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांच्या उपस्थितीत जगदीश गौरी यांचा आणि काँग्रेसचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भाजप पक्षात प्रवेश झाला. काँग्रेस मध्ये असताना आमची कुठलीही कामे होत नव्हती, काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाचा आम्हाला कंटाळा आला होता, त्यामुळे आम्ही सगळ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे जगदीश गौरी यांनी यावेळी सांगितले. त्यांच्यासोबत काँग्रेसचे असंघटित कामगार ठाणे शहर सचिव दिनेश शिळकर, सामाजिक न्याय विभाग ठाणे शहर सचिव संदीप सूर्यवंशी, सुशांत धुळप, वार्ड अध्यक्ष संतोष झिमल तसेच काँग्रेसच्या इतर काही कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजप ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे सरचिटणीस मनोहर सुगदरे, मंडळ अध्यक्ष सुदर्शन साळवी, कार्यकारणी सदस्य अरविंद कलवार, प्रभाग सदस्य गजानन परब, भाजप कामगार मोर्चा सचिव प्रशांत तळवडेकर, उत्तर भारती मोर्चा ठाणे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत यादव, दिव्यांग सेल सचिव आमिन मिश्रा, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य हर्षला बुबेरा, कळवा मंडळ अध्यक्ष भूषण म्हात्रे, कळवा मंडळ अध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा नरेश गायकवाड उपस्थित होते.

## माहिती नष्ट केल्याने फेर मोजणीसाठी दुसरीच यंत्रे - आमदार जितेंद्र आव्हाड



**ठाणे (विशाल कारंडे) :** फेर मतमोजणीसाठी महाविकास आघाडीच्या बहुतेक उमेदवारांनी निवडणूक विभागाकडे पैसे भरले आहेत. मात्र मतदान यंत्रातील माहितीच नष्ट केल्याने यंत्रात काहीच बिघाड नव्हता, हे दाखवण्यास दुसरी यंत्रे दाखवली जाणार असल्याचा दावा शरद पवार गटाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी शनिवारी केला.

आव्हाड म्हणाले की, ज्या यंत्रात मतदान झाले, ती दाखवणार नसतील आणि त्याजागी दुसरी यंत्रे दाखवणार असतील, तर फेरमतमोजणीचा उपयोग काय आहे. ज्या मतदान यंत्रात मतदान झाले, त्यातील मतदानाची माहिती नष्ट केली आहे. २०१९ ते २०२४ या कालावधीत पाच लाख नवीन मतदार नोंदणी झाली. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत ४६ लाख नवीन मतदान झाले. निवडणूक विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही आणि जुन्याच यंत्रणा आहेत. आपली मतदार यादी योग्य नसते. त्यातील दुबार मतदारांबाबत तक्रारी करूनही ती वगळली जात नाहीत. पाच वर्षांत पाच लाख मतदार वाढले असताना, सहा महिन्यात ४६ लाख मतदार वाढले कसे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पक्षाच्या प्रतिनिधींसमोर मतयंत्रे बंद केली जातात. तेव्हाच मतांची आकडेवारी निवडणूक विभागाला प्राप्त होते. परंतु दुसऱ्या दिवसांपर्यंत निवडणूक विभागाच्या आकडेवारीत वाढ होते कशी, असा प्रश्न आव्हाड यांनी उपस्थित केला.

यात निवडणूक विभागाचा सहभाग आहे. निवडणूक विभागाने या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. कारण, ही उत्तरे मिळणे हा आमचा अधिकार आहे.

असेच सुरू राहिले तर भारत हा लोकशाही देश होता, हे इतिहासात लिहिण्याची वेळ येईल, असेही ते म्हणाले. त्यामुळे हा सगळा घोटाळा असून त्याच्या शेवटपर्यंत जाऊन शोध घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले.

# ठाणे सिव्हीलमध्ये एकाच दिवशी १०० बालकांवर शस्त्रक्रीया!

**ठाणे (यश सावंत) :** महागड्या रूग्णालयत लाखो रूपये खर्च करून लहान शस्त्रक्रिया करायची ऐपत सर्वांची नसते. पण त्यावर मात करण्यासाठी लहान मुलांवर जोखमीची शस्त्रक्रिया करायची झाल्यास गरजू सध्या ठाणे सिव्हील रुग्णालय गोठत आहेत. यानुसार या रविवारीदेखील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शुन्य ते १८ वयोगटातील १०० मुला, मुलींच्या डोळयांची, रक्ताची गाठ, चिकटलेली बोट, हर्निया, फायमोसिस, मान, पोटाची गाठ आदीं शस्त्रक्रीय यशस्वीरित्या या एकाच दिवशी करण्याचा विक्रम ठाणे सिव्हील रूग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलाश पवार यांच्या नेतृत्वाखाली रविवारी डॉक्टरांनी केला आहे.



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत के ई एम हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ.संजय ओक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी सिव्हील रुग्णालयात लहान मुला, मुलींच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यावेळी काही जोखमीच्या शस्त्रक्रिया देखील यशस्वी पार पडल्या असून, दुर्बिणीद्वारे देखील बहुतांशी शस्त्रक्रिया केल्या आहेत. सिव्हील रुग्णालयातील शस्त्रक्रिया कक्षात आधुनिक उपकरणे असून, मोठ्या कुशलतेने वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णांच्या शस्त्रक्रिया करत असतात.

**डॉ. कैलास पवार, जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे**

ठाणे शहरात अत्यंत महत्वाचे म्हणून ओळख असलेले सिव्हील रूग्णालय दीड वर्षांपासून येथील वागळे इस्टेट येथे तात्पुरत्या स्वरूपावर स्थलांतर करण्यात आले. मात्र, रुग्णांची आबाळ होणार नाही याची दक्षता आरोग्य प्रशासनाकडून घेतली जात आहे. रुग्णालयात दर दिवशी सुमारे ६०० ते ७०० रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात. काहीवेळा या रूग्णांवर लहान मोठ्या शस्त्रक्रिया ही केल्या जात आहेत. मात्र रविवारी लहान मुलांवर विविध शस्त्रक्रिया करण्याचा अनोखा कार्यक्रम पार पडला. ठाणे, पालघर जिल्ह्यातून आलेल्या मुलांची शारीरिक तपासणी करून सोप्या आणि अवघड अशा दोन्ही प्रकारच्या १०० शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली.

बालकांच्या या नाजूक शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन दिवस अगोदरच मुलांना घेऊन पालक सिव्हील रुग्णालयात दाखल झाले होते. त्यामुळे त्याच्या खाण्या पिण्याची संपूर्ण सोय रुग्णालयाने केली. के ई एम हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ.संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली मुला, मुलींच्या हर्निया, चरबीची गाठ, डोळयांचा तिरळेपणा, फाटलेले ओठ, हायड्रोसील, फायमोसिस, चिकटलेली बोट, रक्ताची गाठ, मूळव्याध अशा विविध शस्त्रक्रिया ठाणे सिव्हील रूग्णालयात पार पडल्या आहेत. यासाठी सायन रुग्णालयाचे मोठे सहकार्य लाभले. ठाणे सिव्हील रुग्णालयात चांगल्या शस्त्रक्रिया होतात हे केवळ ऐकून होतो. मात्र आज प्रत्यक्ष अनुभवलं आहे. एकाच दिवशी एवढ्या मुलांवर शस्त्रक्रिया बघण्याची पहिलीच वेळ आहे. सरकारी रुग्णालयात अशा शस्त्रक्रिया पार पडत असतील तर सर्वांनी सिव्हील रुग्णालयात येऊन उपचार घ्यावेत.

## बोईसर-खैरेपाडा कचराभूमीला पुन्हा आग



**ठाणे (सम्यक कासारे)** - बोईसर जवळील खैरे पाडा ग्रामपंचायत हद्दीतील रोजचा जमा होणारा कचरा खैरे पाडा मैदानाच्या एका बाजूला टाकण्यात आला आहे. गेली अनेक वर्षांपासून टाकण्यात येत असलेल्या कचऱ्यामुळे या ठिकाणी कचऱ्याचे मोठे ढीग तयार झाले आहेत. कचऱ्याच्या या ठिकाणांना वारंवार आग लागून होत असलेले प्रदूषण व त्याचा परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. कचऱ्याच्या साठलेल्या ढिगाना पुन्हा आग लागली असून या आगीमुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण होऊन रस्त्याने प्रवास करणारे वाहन चालक, प्रवासी त्रस्त आहेत.

# मुरबाड मध्ये भात झोडणीसाठी मजूर मिले ना! मजुरीचे दर वाढल्याने शेतकरीवर्ग हवालदिल!



**मुरबाड (गणेश बागडे)** - मुरबाड तालुक्यात सर्वत्र भात कापणीची कामे आटोपली आहेत. आता लक्ष भात पिकाच्या झोडणीकडे लागला आहे परंतु भात झोडणी साठी जेवणासहित पाचशे रुपये मजुरी देऊनही मजूर मिळत नसल्याने शेतकरी मजुरांच्या घरी हेलपाटे मारत आहेत त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

तसेच सर्व शेतकऱ्यांना ज्या ज्या ठिकाणी भाताचे भारे जास्त मिलायचे त्या त्या ठिकाणी भाताच्या भाड्यामध्ये यंदा घट झाल्याची माहिती शेतकरी वर्गाने दिली आहे. परंतु मुरबाड तालुक्यातील गावोगावी भात झोडणी सुरू झाल्यामुळे मजुरांची टंचाई भासत असल्याने तालुक्यातील अनेक शेतकऱ्याकडून बोलले जात आहे. गेल्या वर्षी भात झोडणीच्या मजुरीचा रेट ४५० रुपये होता तोच रेट यंदा ५०० रुपये झाला आहे त्यातच मजुराचा नाश्ता व जेवणाचा खर्च वेगळाच इतके असूनही शेतीकामासाठी मजूर मिळत नाही तसेच सकाळी उठल्यानंतर व सायंकाळी झोडणी साठी वाड्या-पाड्यात जाऊन मजूर शोधण्यासाठी वणवण करावी लागत आहे. आदिवासी बांधव हे जे शेतमजुरी करायचे तेच मजूर वीट भट्टी तसेच शहराकडे कामासाठी स्थलांतर झाल्यामुळे शेतमजूर मिलने कठीण झाले आहे. तसेच शेतात मजुरांना वर्षभर पुरेल एवढेच काम राहत नाही केवळ हंगामामध्येच ते काम येते त्यामुळे अनेक मजूर शहराच्या ठिकाणी नोकरी धंद्यासाठी निघून गेले असून त्यामुळे आम्हाला नातेवाईक व कुटुंबांना भात झोडणी करावी लागते असे शेतकरी रघुनाथ कोंडाजी धुमाळ यांनी बोलताना सांगितले.

# वाढलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर केडीएमसी उपायुक्त संजय जाधव यांनी केली बेघर निवारा केंद्राची पाहणी

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बेघर नागरिकांना सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार डोंबिवली पूर्वेतील पांडुरंग वाडी येथे तसेच टिटवाळा परिसरात आणि कल्याण पश्चिम येथे महानगरपालिकेने बेघर व्यक्तींसाठी 'बेघर निवारा केंद्राची' व्यवस्था केलेली आहे. या बेघर निवारा केंद्रात बेघर व्यक्तींना नाष्टा, जेवण, स्नानासाठी गरम पाणी व तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था महापालिकेमार्फत केली जाते. काल कल्याण मध्ये वाढलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी रात्री ११ वाजता कल्याण पश्चिम येथील क प्रभागा नजीक तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या बेघर निवारा केंद्राला तसेच डोंबिवली पूर्व येथील पांडुरंग वाडी मधील सावली निवारा केंद्राला भेट देऊन तेथे बेघरांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली. रात्रीच्या वेळी असलेल्या कडाक्याच्या थंडीचे स्वरूप पाहता तेथील बेघर नागरिकांना पांघरण्यासाठी पुरेशा प्रमाणात चादरी उपलब्ध आहेत याचीही त्यांनी खातर जमा केली आणि बेघर व्यक्तींची आपुलकीने विचारपूस केली.



# कल्याणमध्ये मुरबाड रोडवर महिलेचे मंगळसूत्र खेचून दुचाकीस्वारांचा पळ

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** येथील पश्चिमेतील सर्वाधिक वर्दळीच्या मुरबाड रस्त्यावरून शुक्रवारी दुपारच्या वेळेत पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी पादचारी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. या महिलेने चोर म्हणून ओरडा केला, तोपर्यंत दुचाकीवरील चोरटे पळून गेले होते. ५५ हजार रूपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र होते. महात्मा फुले पोलीस ठाण्यात महिलेने या चोरीप्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. तक्रारदार महिला कल्याण पश्चिमेतील पौर्णिमा चौक भागात कुटुंबियांसह राहते. शुक्रवारी दुपारी पावणे तीन वाजता तक्रारदार महिला आपल्या शाळकरी मुलीला खासगी शिकवणी वर्गात सोडण्यासाठी पुरंदरे वसाहतीमध्ये गेल्या होत्या. मुलीला सोडल्यानंतर त्या एकट्याच दुपारच्या वेळेत पायी घरी परतत होत्या. त्या मुरबाड रस्त्यावरील किशोर बूट दुकानासमोरून जात असताना, त्यांच्या पाठीमागून अचानक एक दुचाकी वेगाने पादचारी महिलेच्या अंगावर आली. त्या रस्त्याच्या बाजुला झाल्या.



तेवढ्या वेळेत दुचाकीवरील इसमांनी तक्रारदार महिलेला काही कळण्याच्या आत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे ५५ हजार रूपये किमतीचे मंगळसूत्र जोराने हिसकावले. तेथून त्यांनी पळ काढला.

मानेला जोराने हिसका बसल्याने महिलेला सुरूवातीला काही क्षण काय घडले हे कळलेच नाही. त्यांनी मानेभोवती हात लावला. त्यावेळी त्यांना आपले सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या इसमांनी खेचून पळून गेले असल्याच्या त्यांच्या निदर्शनास आले. त्या चोर म्हणून ओरडल्या, तोपर्यंत दुचाकीस्वार पळून जाण्यात यशस्वी झाले होते.

कल्याण, डोंबिवलीत काही दिवसांपासून दुचाकीवरून येऊन मंगळसूत्र, सोन्याचा ऐवज लुटण्याचे प्रकार थांबले होते. हे प्रकार आता पुन्हा सुरू झाले आहेत. ठाकुर्लीतील ९० फुटी रस्ता, एमआयडीसी डोंबिवली, खडकपाडा भागात नागरिक सकाळ, संध्याकाळ फिरण्यासाठी येतात. त्या काळात हे प्रकार अधिक प्रमाणात होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

# मुंबईत आजपासून ५ दिवस पाणी कपात

**मुंबई (विशाल कारंडे) -** मुंबई महापालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या पिसे येथील न्यूमॅटिक गेट सिस्टममध्ये ३० नोव्हेंबर रोजी बिघाड झाला आहे. या गेटच्या दुरुस्तीचे काम १ डिसेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत केले जाणार आहे. त्यामुळे ही पाणी कपात केली जाणार आहे, अशी माहिती मुंबई महानगर पालिकेने जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेकडून होणाऱ्या पाणी कपातीचा ठाणे आणि भिवंडी या महापालिकांनादेखील फटका बसणार आहे. १ डिसेंबर ते ५ डिसेंबर या काळात या महापालिकांमध्ये देखील १० टक्के पाणी कपात केली जाईल. या कालावधीत पाणी जपून वापरावे आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहनदेखील महापालिकेच्या निवेदनात करण्यात आले आहे. गेल्या महिन्यात महापालिकेने १७ ते १८ ऑक्टोबर यादरम्यान मुंबईत ५ ते १० टक्के पाणी कपातीची घोषणा केली होती, यावेळी ठाणे जिल्ह्यातील पाईपलाईनवरील व्हॉल्व्हमध्ये बिघाड झाल्याचे कारण सांगण्यात आले होते. मुंबई महापालिकेने निवेदन जारी करत वैतरणा पाईपलाईनवरील



तराळी येथे ९०० एमएम व्हॉल्वमध्ये बिघाड झाल्याने पाणी पुरवठा तात्पुरता थांबवण्यात आल्याचे सांगितले होते. मुंबई शहर आणि उपनगर भागांना होणारा पाणी पुरवठा हा वैतरणा धरणातून केला जातो.

मुंबईत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यावरून भाजपाने काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांना लक्ष केले होते. गेल्या १० वर्षांत महापालीकेने एकही नवीन धरण बांधले नाही किंवा इतर कुठली पर्यायी व्यवस्था उभी केली नाही. उलट गारगाई धरण प्रकल्प रद्द करून समुद्रातील पाणी डिसेलिनेट करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला, पण तो देखील पूर्ण होऊ शकला नाही, अशी टीका भाजपा नेते आशिष शेलार यांनी केली.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील अविभाजित शिवसेनेचे १९९७ ते २०२२ या काळात सलग २५ वर्षे मुंबई महापालिकेवर नियंत्रण होते. पण विशेष बाब म्हणजे यापैकी बराचसा काळ शेलार यांचा भाजपा पक्षदेखील शिवसेनेचा सहकारी पक्ष होता. १९९० च्या दशकात माधवराव चितळे यांच्या नेतृत्वाखालील समितीने मुंबईसाठी गारगाई, पिंजाळ आणि मध्य वैतरणा अशी तीन नवीन धरणे बांधण्याचा प्रस्ताव दिला होता. मध्य वैतरणा हे २०१४ मध्ये पूर्ण झाले, पण त्यानंतर नवीन प्रकल्प सुरू करण्यात आला नाही, असेही शेलार म्हणाले होते. गारगाई धरणाच्या नियोजनाच्या परवानगीचे काम सुरू झाले होते, पण ठाकरे पर्यावरणमंत्री असताना हा प्रकल्प रद्द करण्यात आला. तसेच कंत्राटदारांच्या फायद्यासाठी ४,४०० कोटी रुपये खर्च करून डिसॅलिनेशन प्रकल्प सुरू करण्यात आला, ज्याचा खर्च नंतर ८,००० कोटी रूपयांपर्यंत वाढला, असा आरोपही भाजपा नेते शेलार यांनी केला.



## वसई विरार मॅरेथॉनसाठी विशेष लोकल

**मुंबई (यश सावंत) :** वसई-विरार मॅरेथॉन निमित्ताने ८ डिसेंबर रोजी विशेष लोकल चालविण्याचा निर्णय पश्चिम रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार ८ डिसेंबर रोजी पहाटे चर्चगेट ते विरारपर्यंत दोन अतिरिक्त विशेष धीम्या लोकल चालविण्यात येतील. ८ डिसेंबर रोजी रात्री २.३० वाजता चर्चगेटहून धीमी लोकल चालविण्यात येईल. ही लोकल विरारला पहाटे ४.०५ मिनिटांनी पोहचेल. यानंतर रात्री ३ वाजता दुसरी विशेष लोकल चालविण्यात येईल. ही लोकल पहाटे ४.३५ वाजता विरारला पोहचेल. या दोन लोकलमुळे मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांना लाभ घेता येईल, अशी माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

SPORT

# D Gukesh is future GOAT, says USA GM

**USA -** India's D Gukesh is a future GOAT, feels USA Grand Master Maurice Ashley. Ashley, who is currently watching Gukesh challenge for the World Test Championship title, said that Gukesh is yet to reach his peak, which might come in 10 years time. Ashley predicted that Gukesh might reach heights that has not been seen before.

Gukesh, 18, is currently challenging Ding Liren in the World Chess Championship Final, a 14-round tournament to decide who will be ranked as the champion in chess this year. Gukesh shocked the world after winning the Candidates tournament at 18 years of age, beating several heavyweights.

In his path to the final, Gukesh also won India's first ever Chess Olympiad where he secured the individual gold medal for exceptional performance on Board 1.

World Championship, at 18 years young, Gukesh is still at least 10 years away from his peak strength as a player. He's not a fluke, not a one and done. We are looking at a future all-time great who will be around for a long time to come, Maurice Ashley said.

Earlier, Indian prodigy D Gukesh fought to a hard-earned draw against reigning champion Ding Liren in the fifth game of the World Chess Championship on Saturday. The intense contest saw the 18-year-old challenger and the 32-year-old champion sign peace after 40 moves, marking their third




draw in the series. With both players tied at 2.5 points, they remain five points shy of securing the coveted title.

Gukesh, the youngest-ever challenger for the world crown, employed the King's pawn opening but faced Ding's well-prepared French Defense for the second time in the match. Having lost the opening game to the same strategy, Gukesh approached cautiously, opting for the Exchange variation. Despite his efforts to create imbalances, Ding remained steadfast, maintaining a solid position throughout the game.

The match's critical juncture arrived as Gukesh allowed Ding to secure a protected passed pawn on the sixth rank. However, the defending champion chose an equalising endgame with opposite-colored bishops rather than pressing for a decisive edge. The ensuing endgame saw Ding part with a pawn to build a fortress, ensuring no further progress for either side.

Both players adhered to the championship's minimum requirement of 40 moves before concluding the game. Although Ding briefly appeared to hold the upper hand, Gukesh's resilient defense ensured the game ended in a stalemate, preserving the deadlock at 2.5 points each. Gukesh, who claimed victory in the third game of the series, showcased his unorthodox style by adopting the Exchange variation early in the game, removing queens by the ninth move. This uncharacteristic approach unsettled Ding momentarily but ultimately enabled the reigning champion to advance on the king's side. A daring maneuver by Gukesh (Nxg5 followed by Ngf3) allowed Ding deeper penetration into his territory, but the young Indian's tactical acumen thwarted any attempts at converting the advantage. This marks the first game where Ding faced no significant trouble with the black pieces, reflecting his growing composure. As the championship progresses, both players will aim to break the deadlock and inch closer to the eight points required for victory.



## Injury Woes for Rhea Ripley? The Aftermath of WWE Survivor Series 2024

**New Delhi -** Rhea Ripley, the formidable former Women's World Champion, showcased her resilience and toughness at WWE Survivor Series 2024, despite nursing an orbital fracture. The injury, which sidelined her for several weeks, didn't deter The Nightmare from competing in the brutal WarGames match.

Ripley's participation in the high-stakes match was a testament to her dedication to her craft and her unwavering commitment to entertaining the WWE Universe. The match, filled with high-impact moves, intense brawling, and chaotic moments, pushed Ripley to her physical limits. Despite the grueling nature of the match, Ripley emerged victorious, leading her team to a hard-fought win. Following the match, Ripley addressed her injury during the post-show press conference. When asked about her recovery, she responded with characteristic nonchalance, stating, "Honestly, I can't see it so I don't know, but it feels pretty good." While Ripley's quick recovery is impressive, it's important to note that such injuries can have long-term consequences. Fans will be closely monitoring her health and hoping for a speedy recovery. The victory solidified Ripley's position as one of the top female wrestlers in the world and further cemented her status as a dominant force in WWE. Her ability to overcome adversity and deliver a top-tier performance, even while injured, is a testament to her skill, determination, and unwavering commitment to her craft. Despite the injury, Ripley's performance at Survivor Series was nothing short of spectacular. Her ability to seamlessly blend power, agility, and technical skill made her a standout performer in the match. Her unwavering determination and fearless attitude were evident as she fearlessly took on her opponents, delivering impactful moves and strategic maneuvers.

## WTC Points Table 2023-25 After England's Win

## India Maintain Top Spot; NZ's Hope Of Finals Suffer Massive Blow

**New Delhi -** England completed a magnificent win against New Zealand on Sunday in the first Test, chasing down their target of 104 runs in just 12.4 overs.

For New Zealand, this result eradicates the chances of qualifying for the World Test Championship (WTC) final in the 2023-25 cycle.

n their most recent victory, England improved their record in the current World Test Championship cycle, bringing their 20-match tally for the cycle



to 10 wins, translating to a point percentage of 43.75.

In the 2023-25 cycle, New Zealand has a point percentage of 50 from 12 Tests, with six wins and six losses.

The result of this Test match held in Christchurch has greatly altered New Zealand's chances of reaching the World Test Championship final. Their defeat saw their PCT decline massively by an alarming 4.55%; as a result, New Zealand finds itself level with Sri Lanka on equal footing-PCT 50.00.

The top three positions in the WTC standings do not change. After their remarkable 233-run win over Sri Lanka on Saturday, South Africa has now gone to second place with a PCT of 59.26%. Australia stayed in third position with a PCT of 57.69%.

Following a jarring 3-0 home series defeat against New Zealand in October, which saw them drop a rank on the WTC table, India crawled back into contention for a spot in the WTC finals with an emphatic win in Australia. The fabulous all-rounded performance, with match-winning knocks from the batters and commendable operations from the bowlers in Perth, has brought back the hope of a third successive WTC Final into the Indian camp.

## Joe Root Creates History, Breaks Sachin Tendulkar's Record To Become....



| Batsmen with most runs in 4th innings in Tests | Runs |
|---|---|
| Joe Root | 1630 |
| Sachin Tendulkar | 1625 |
| Alastair Cook | 1611 |
| Graeme Smith | 1611 |
| Shivnarine Chanderpaul | 1580 |

**New Delhi -** Joe Root continued to shatter records and he created history during the first Test of the three-match series against New Zealand in Christchurch. The right-handed batsman remained unbeaten on 23 off 15 balls as England chased down the target of 104 to go 1-0 up. Root hit 3 boundaries and a six during his knock.

Root broke Sachin Tendulkar's record during his innings and became the batsman with the most runs in 4th innings of Test matches. Sachin, who retired from international cricket in 2013, topped the list for over a decade. The Master Blaster scored 1625 runs in the fourth innings in 200 Tests. Root now has 1630 runs in the fourth innings of 149 Test matches he has played so far. With 1611 runs, Alastair Cook and Graeme Smith share the third spot. Root has broken several records held by Sachin and he is also eyeing the record for the most runs in the history of Test cricket. Sachin finished his Test career with 15921 runs. Root has piled up 12754 runs and can break Sachin's record in the next 3-4 years.

## Sub-Junior National Badminton Championship 2024

## Satvik Agrawal bags silver medal in U-13 boys singles

**Jaipur :** Promising city shuttler Satvik Agrawal bagged a historic silver medal at the 36th Sub-Junior National Badminton Championships 2024 which concluded in Jammu on Saturday. Second seed Satvik went down fighting in the U-13 boys singles final and had to be satisfied with a runner-up spot in the season-ending Nationals, organized by the Badminton Association of India. Unseeded Anikesh Dutta of Assam beat Satvik 21-17, 21-7 in the final that lasted for 36 minutes. Satvik, a Standard VIII student of Sand Dune Academy Muhana, fought hard in the first game but could not produce his best as the match progressed. Interestingly, Satvik had defeated Anikesh 24-22, 21-19 in the final of the All-India U-13 tournament in Dibrugarh, Assam, exactly a month ago to become the first Rajasthan player to win the national-level crown.

# राजभवन येथे नागालँड व आसाम राज्य स्थापना दिवस साजरा

## भावनिक ऐक्य वाढण्यासाठी उत्तर पूर्व राज्यांना भेट देण्याचे राज्यपालांचे आवाहन

● मुंबई, राकेश गायकवाड :

आपल्या राज्य स्थापनेपासून नागालँड व आसाम या राज्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती व पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. दोन्ही राज्यांना निसर्ग संपदेचे वरदान लाभले आहे. देशातील राज्ये समजून घेण्यासाठी त्या-त्या राज्यांना प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे व तेथील संस्कृती लोकांमध्ये राहून समजून घेतली पाहिजे. नागालँड व आसाम राज्यांना भेट देऊन तेथील लोकांशी संवाद वाढवल्यास राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होईल. यास्तव नागरिकांनी उभय राज्यांना भेट द्यावी असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपालांच्या उपस्थितीत नागालँड (१ डिसेंबर) व आसाम (२ डिसेंबर) राज्य स्थापना दिवस संयुक्तरित्या साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राजभवनतर्फे एसएनडीटी महिला विद्यापीठ व 'ईश्वरपूरम पुणे' या उत्तर पूर्व राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेच्या सहयोगाने करण्यात आले.







राज्य स्थापना दिवस साजरे करताना आपल्याला विविधतेतून सामान भारतीय मूल्ये दिसून येतात. त्या - त्या प्रदेशांचे गीत, नृत्य, लोककला व खाद्य संस्कृतीची माहिती होते. आज देशातील केंद्र शासनातर्फे विविध राज्यांमधील युवकांना इतर राज्य जाणून घेण्याची संधी दिली जात आहे.

## बस चालकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

● पुणे, अभिजीत येरल्लू: :



विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचालकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना कोंढव्यातील सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात घडली. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी संस्थेच्या संचालकांसह कर्मचाऱ्यांविरुद्ध कोंढवा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष पांडुरंग माळवदकर (वय ४७, रा. पिसोळी ग्रामपंचायतीसमोर, कोंढवा) असे मृत्युमुखी पडलेल्या बसचालकाचे नाव आहे. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी सिंहगड सिटी स्कूलचे संचालक धनंजय तुकाराम महाडिक, संस्थेतील वाहतूक पर्यवेक्षक दौलत दत्तात्रय ढोक, विजय संपत कुंभार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत संतोष माळवदकर यांची पत्नी सुनीता (वय ४०) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष माळवदकर सिंहगड सिटी स्कूलमधील विद्यार्थ्यांची वाहतूक करतात. १८ ऑक्टोबर रोजी ते सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात लावलेली बस पाणी मारुन स्वच्छ करत होते. त्यावेळी बसमधील कॉम्प्रेसरमधील वायरमधून विजेचा धक्का माळवदकर यांना बसला. विजेच्या धक्का बसल्याने माळवदकर बेशुद्ध पडले. संस्थेतील कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण अटकेतील २६ आरोपींवर मोक्का

● मुंबई, विशेष प्रतिनिधी :



माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटक केलेल्या सर्व २६ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्याअंतर्गत म्हणजेच मोक्काअंतर्गत कारवाई आली आहे. तसेच, याप्रकरणी लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल बिष्णोईसह तिघांचा सहभाग उघड झाला असून त्यांनाही याप्रकरणी आरोपी करण्यात आले आहे. याप्रकरणी पंजाबमधून अटक करण्यात आलेला सुजीत सुशील सिंह हा कुख्यात लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोलच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे अनमोल बिष्णोईला या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे.

अनमोल बिष्णोईने यापूर्वी अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार घडवून आणला होता. सिंहच्या सांगण्यावरून या प्रकरणातील अटक आरोपी नितीन सप्रे व राम कनोजिया यांनी बाबा सिद्दिकी यांचे घर व आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाची पाहणी केली होती. सुजीत सिंह याने परदेशातील गुंडासोबत संपर्क साधला होता.

सिंह विविध समाज माध्यमातून अनेक खात्यांवर संवाद साधत होता. पंजाब पोलीस व मुंबई पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत सिंहला लुधियानातून पकडण्यात आले होते. सिंह बाबा सिद्दिकीला मारण्याच्या कटात सहभागी होता. याप्रकरणी आतापर्यंत पाच पिस्तुल जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांच्या मते, सिंहला बाबा सिद्दिकीच्या हत्या कटाची माहिती होती आणि तो अनमोल बिश्नोईच्या संपर्कात होता. त्याने इतर आरोपींना पैसे पुरवले आणि शस्त्रांचा पुरवठा करण्यातही सहभागी होता.

## राज्य सरकारच्या जंतनाशक मोहिमेतून पुण्याला वगळलं!

● पुणे, शकील शेख :

राज्य सरकारकडून येत्या ४ डिसेंबरपासून जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम राज्यभरात राबविण्यात येणार असली, तरी त्यातून पुणे शहर वगळण्यात आले आहे. कारण राज्य सरकारकडून पुणे महापालिकेला जंतनाशक गोळयांचा पुरवठाच झाला नसल्याचे समोर आले आहे. गोळयांचा साठा नसल्याने ही मोहीम अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा आदेश राज्य सरकारने पुणे महापालिकेला दिला आहे.

राज्य सरकारकडून राष्ट्रीय जंतनाशक दिनापासून म्हणजेच ४ डिसेंबरपासून ही मोहीम १६ आदिवासी जिल्हे आणि १९ महापालिकांमध्ये राबविण्यात येणार आहे. ही मोहीम १० डिसेंबरपर्यंत राबविण्यात येईल. या मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शाळा आणि अंगणवाडी केंद्रावर अल्बेनडेझोल या जंतनाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत. या मोहिमेसाठी गोळयांचा पुरवठा राज्य सरकारकडून केला जातो. या वेळी जिल्हा आरोग्य विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला गोळयांचा पुरवठा झाला. मात्र, पुणे महापालिकेला गोळयांचा पुरवठा करण्याआधी त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल सरकारला मिळाला. त्यामुळे महापालिकेला गोळयांचा पुरवठा झाला नाही.

याबाबत महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे म्हणाले, की राज्य सरकारकडून गोळयांचा पुरवठा होणार होता. मात्र, त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल आल्याने पुरवठा होऊ शकला नाही. राज्य सरकारकडून पुरवठा झाल्यानंतर जंतनाशक मोहीम राबविली जाईल. ही मोहीम ४ डिसेंबरपासून सुरू होणार नसली, तरी आमच्याकडे सध्या महापालिकेच्या दवाखान्यात येणाऱ्या मुलांना देण्यासाठी जंतनाशक गोळयांचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी गोळयांची टंचाई नाही.

राज्य सरकारकडून वेळेत जंतनाशक गोळयांचा पुरवठा न झाल्याने जंतनाशक मोहीम पुढे ढकलण्यात आली आहे. ही मोहीम राबविण्याची पुढील तारीख राज्य सरकारच्या आदेशानुसार निश्चित केली जाईल.



■ पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी राज्य सरकारकडून गोळयांचा पुरेसा पुरवठा झाला आहे. आमच्याकडे बुलडाण्यावरून गोळ्या पाठविण्यात आल्या आहेत. जंतनाशक मोहीम राबविण्याचे प्रशिक्षण अंगणवाडीसेविका आणि आशासेविकांना देण्यात आले आहे.

**- डॉ. नागनाथ येमपल्ले, जिल्हा शल्यचिकित्सक**

### गोळ्यांची आवश्यकता किती?

- ■ पुणे महापालिका – ४ लाख ५० हजार
- ■ पिंपरी-चिंचवड महापालिका – १ लाख ७० हजार
- ■ पुणे ग्रामीण – १ लाख ५० हजार

## शपथविधी गुरुवारी; आझाद मैदानावरील सोहळ्याला पंतप्रधानांसह ज्येष्ठ नेत्यांची उपस्थिती



● मुंबई, यश सावंत :

महायुतीमध्ये सरकार स्थापण्याबाबतची चर्चा थंडावली असली तरी येत्या गुरुवारी म्हणजे ५ डिसेंबरला नवीन सरकारचा शपथविधी पार पडेल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी जाहीर केले. खातेवाटप आणि मंत्र्यांची संख्या यावर तिन्ही घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये सोमवारनंतरच चर्चा केली जाणार आहे. भाजपकडून काही नवीन चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाण्याची चिन्हे आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शपथविधीचा मुहूर्त अखेर ठरला असून ५ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता मुंबईत आझाद मैदानात शपथविधी समारंभ होणार आहे. नवे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होणार असून भाजप पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष नड्डा,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, एनडीएतील घटक पक्षांचे नेते, संत, महंत व धर्मगुरू हे शपथविधी समारंभास उपस्थित राहतील. फडणवीस यांच्या नावावर पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केल्याने भाजप विधिमंडळ पक्षाची नेतानिवडीची बैठक ३ किंवा ४ डिसेंबरला विधान भवनात घेण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे राज्यभरातून येणाऱ्या आमदारांना बैठक व शपथविधी समारंभास हजर राहणे सोयीचे होईल. बावनकुळे यांनी शपथविधी समारंभास राज्यभरातील कार्यकर्त्यांना मुंबईत येण्याच्या आणि त्यादिवशी राज्यभरात जल्लोष करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### पहिल्या टप्प्यात २५ ते २७ मंत्री?

■ पहिल्या टप्प्यात २५-२७ मंत्र्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळात भाजपला २०, शिवसेनेला ( एकनाथ शिंदे ) १३ व राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) ९ मंत्रीपदे असे सूत्र निश्चित झाल्याचे समजते. मंत्रिमंडळात काही जागा रिक्त ठेवल्या जाणार असून पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ-नऊ मंत्र्यांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. भाजपकडून काही नवीन व तरुण चेहऱ्यांना संधी दिली जाणार असून सत्तरी गाठलेल्या नेत्यांना संधी मिळणे अवघड आहे. मुंबईतून दोन-तीन नेत्यांना मंत्रीपदाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

### चर्चा थंडावली

■ सरकार स्थापण्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे गुरुवारी मध्यरात्री झालेल्या बैठकीनंतर पुढील रणनीती ठरविण्यासाठी मुंबईत चर्चा करण्यात येईल.

■ पण शुक्रवारी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या गावी रवाना झाले. ते रविवारी मुंबईत परतण्याची शक्यता आहे.

■ शनिवारी देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे दोघेही मुंबईबाहेरच होते. यामुळे पुढील चर्चा अजून झालेली नाही. मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटप यावर सोमवारनंतरच चर्चा होईल, असे समजते.

## देशसेवेसाठी आव्हानात्मक मार्गांचा अवलंब करा – हवाई दल प्रमुख अमर प्रीत सिंग

● पुणे, अभिजित येरल्लू :



देशाच्या संरक्षणासाठी मोठ्या प्रसंगांना परिस्थितीनुरूप तोंड द्यावे लागते. मात्र, या बदलत्या परिस्थितीची संधी साधून कठीण निर्णय घेण्याची वेळ आल्यास देशसेवेच्या विचारांशी एकनिष्ठ राहून आव्हानात्मक मार्गांचा अवलंब करावा, असे मार्गदर्शन हवाई दल प्रमुख अमर प्रीत सिंग यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतून उत्तीर्ण होणाऱ्या छात्रांना केले. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४७ व्यां तुकडीचा दीक्षान्त संचलन सोहळा आज खेत्रपल मैदानावर दिमाखात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. एअर व्हाइस मार्शल सरताज बेदी, एनडीएचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल गुरुचरणसिंह, दक्षिणी मुख्यालयाचे प्रमुख जनरल धीरज सेठ या वेळी उपस्थित होते. पहाटेच्या रम्य वातावरणात बिगुल वाजल्यानंतर विविध सुरावटींवर संचलन करत लष्करी बँडचे खेत्रपाल मैदानावर आगमन झाले. त्यानंतर हवाई दल प्रमुखांनी संचलनाचा आढावा घेतला. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील खडतर प्रशिक्षण पूर्ण करून छात्रांनी केलेल्या दिमाखदार संचलनाला चेतक हेलिकॉप्टर, सुखोई यासह पी ८ आय पोसायडन या लढाऊ विमानाने पहिल्यांदाच सलामी दिली. अंकित चौधरी या छात्राने संचलनाचे नेतृत्व केले. या संचलनात क्युबेक या महिलांचे पथकही सहभागी झाले होते. हवाई दल प्रमुखांनी छात्रांना संबोधित करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच तिन्ही वर्षांत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या अंकित चौधरी यांना राष्ट्रपती सुवर्ण पदक, युवराजसिंग चौहान यांना रौप्य पदक, जोधा थोंगजय मयो यांना कांस्य पदक प्रदान करण्यात आले.

## विदेशी 'पाहुण्यां'ची अद्याप प्रतीक्षाच, 'झुडपी'ची हजेरी...

● नाशिक, सचिन कदम :

अकोला : हिवाळा लागताच पाणवठ्यावर येणाऱ्या विदेशी पाहुण्या पक्ष्यांचे विशेष आकर्षण असते. यंदा मात्र जलाशयांना अद्यापही स्थलांतरित पाणपक्ष्यांची प्रतीक्षा लागली आहे. काही झुडुपी पक्ष्यांनी हजेरी लावली आहे, अशी माहिती ज्येष्ठ पक्षीमित्र दीपक जोशी यांनी दिली. थंडीची चाहुल लागताच परिसरातील जलाशयांवर स्थलांतरित पक्षी डेरेदाखल होत असतात. या पक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी अभ्यासकांची गर्दी होते. दरवर्षी पक्षीमित्रांना पाहुण्या पक्ष्यांच्या आगमनाची उत्सुकता असते. हवाई मार्गे हजारो कि.मी. चा प्रवास करून आपल्या परिसरातील पाणवठ्यांवर येणाऱ्या रंगीबेरंगी, स्थलांतरीत, चिमणी एवढ्या धोबी पक्षापासून ते उंच, देखण्या करकोचांची, बदकांची, शिकारी पक्षांची, झुडपी खग आदी आकर्षणाचा केंद्रबिंदू असतात. विविध तर्हेचे हे द्विजगण भारतभर पसरतात. अनुकुल प्रदेश आढळताच त्याठिकाणी ते पक्षी विसावतात. पोट पुजेसाठी सर्वदूर पक्ष्यांचे थवे विखुरतात. निसर्गाने त्यांना विविधतेने नटवलेले असतेच. ही पक्षी संपदा पक्षी मित्रांना भुरळ घालत असते. त्या पक्ष्यांना निहाळण्यासाठी पक्षी मित्र हिवाळयाच्या गुलाबी थंडीत पंचक्रोशीतील पाणवठे पालथे घालतात. परिसरातील अनेक जलाशयावर हिवाळयात हे द्विजगण दरवर्षी हजेरी लावतात. यावर्षी काही पक्षी अकोला शहरातील आवडत्या ठिकाणांना, आजुबाजुच्या पाणवठ्यांना भेटी देत आहेत. पण अद्याप स्थलांतरित पाहुण्यांचे आगमन झालेले नाही. त्यामुळे पाणवठ्यांना सुद्धा पक्ष्यांची प्रतीक्षा लागली आहे. निसर्गदूत परिसरात कधी अवतरतात यांची उत्कंठा लागली आहे.



काही झुडुपी स्थलांतरीत पक्षांनी हजेरी लावली आहे. त्याबरोबर स्थानिक पक्ष्यांना न्याहाळणे हा आनंदसोहळा पक्षी मित्रांना सुखावतो आहे. कुंभारी जलाशय, कापशी तलाव, आखातवाडा, मोर्णा धरण, चेल्का पाणवठ्यांना भेटी दिल्यावर स्थलांतरित पक्षांनी अद्याप हजेरी लावलेली नसल्याचे आढळून आले आहे, असे ज्येष्ठ पक्षीमित्र दीपक जोशी यांनी सांगितले. यावेळी पक्षीमित्र डॉ.अतुल मुंदडा, डॉ.सतीश पडघन, निलेश पडघन, श्रीकांत वांगे, सुभाष पडघन, अनुल मनवर आदींनी पाणवठ्यांवर निरीक्षण केले.

### अकोल्यात १५९ प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद

अकोला जिल्ह्यात एकूण १५९ प्रजातींचे पक्षी हिवाळी पाहुणे म्हणून येतात. यात पाणथळीच्या पक्ष्यांबरोबरच माळरानावरचे, शाखारोही आणि शिकारी पक्षीही असतात. पाणपक्ष्यांमध्ये विविध प्रकारची बदके, पाणथळीत पोटपुजा करणारे पक्षी दाखल होतात. तसेच गप्पीदास, कस्तुर, शंकर, धोबी, क्रौंच असे छोटे मोठे पक्षीही येतात. या सर्वांच्या मागावर असलेले दलदल ससाणा, शिक्रा, कवड्या हरिअर, श्येन, तीसा, कुकरी, खरुची असे शिकारी पक्षीही येतात.